लोकसत्ता

बुधवार, १९ जानेवारी २०११



# ...तर तळोजाचे जयपूर झाले असते !



अनिरुद्ध भातखंडे/ जयेश सामंत
aniruddha.bhatkhande@expressindia.com
jayesh.samant@expressindia.com

औद्योगिक सुरक्षिततेविषयी कमालीची अनास्था बाळगणाऱ्या राज्य शासनाच्या डोळ्यात आज कळंबोली येथे अग्निशमन दलाच्या काही मोजक्या जवानांनी आपल्या जीवाची बाजी लावत पुन्हा एकदा झणझणीत अंजन घातले. जयपूरमधील इंडियन ऑईलच्या डेपोस लागलेल्या आगीची आठवण ताजी व्हावी, अशी भयावह आग आज सकाळी येथील एमआयडीसी भागातील इंडियन ऑईलच्या गोदामास लागली आणि सर्वत्र घबराटीचे वातावरण पसरले. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या वंगणाचा (लुब्रिकन्ट ऑईल) सुमारे दहा लाख लिटरचा मोठा साठा या गोदामात होता. तुलनेने जड असणारे हे तेल डिझेल-पेट्रोलच्या तुलनेत उशिरा आग पकडते. मात्र, एकदा का या तेलाने पेट घेतला की ती आटोक्यात येणे अत्यंत कठीण असते. रात्री दोन वाजताच्या सुमारास या गोदामातील तेलाने भरलेल्या एका लहानग्या डब्याने पेट घेतला आणि बघता-बघता चार हजार चौरस मीटरचा संपूर्ण परिसर आगीच्या ज्वाळांनी पेटून उठला. आग वणव्यासारखी पसरत असताना अग्निशमन जवानांनी जीव धोक्यात घालून दहा लाख क्षमतचे ऑईल टँक कसेबसे वाचविले; अन्यथा कळंबोलीचे जयपूर होण्यास वेळ लागला नसता.

महाराष्ट्रातील उद्योगांमधील पायाभूत सुविधांकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून वेगवेगळ्या भागांमध्ये काम सुरू असते. मात्र, उद्योग उभारणीच्या प्रक्रियेत औद्योगिक सुरक्षितताही किती महत्त्वाची आहे, हे आज कळंबोली एमआयडीसीत घडलेल्या घटनेमुळे पुन्हा एकदा दिसून आले. एमआयडीसी भागांमध्ये अग्निशमन केंद्र उभारताना नाकं मुरडणाऱ्या राज्य सरकारची अब्रू आज कळंबोलीत याच अग्निशमन दलाच्या जवानांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे कशीबशी वाचली. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वंगणाचा मोठा साठा कळंबोलीतील इंडियन ऑईलच्या या केंद्रात केला जातो. ही आग ज्या गोदामात लागली, त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचे वंगण जळून अक्षरशः खाक झाले. परंतु, याच परिसरात २०० लिटर ऑईल असलेले सुमारे एक हजारांहून अधिक ड्रम वाचविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विभागीय अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे सहकारी किरण हत्याळ, रायबा पाटील, आर.ए.घरत या अधिकाऱ्यांच्या टीमने सलग १२ तासांहून अधिक काळ अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही आग आटोक्यात आणली. रात्री उशिरा गोदामाला लागलेली आग बघता-बघता तब्बल चार हजार चौरस मीटर क्षेत्रफळात पसरली. लुब्रिकन्ट ऑईल तसे उशिराने पेट घेते. त्यामुळे आग आटोक्यात आणण्यात काहीसा वेळ जवानांना मिळाला. नवी मुंबई महापालिका, सिडको, जेएनपीटी तसे इंडियन ऑईलच्या अग्निशमन यंत्रणांनी घटनास्थळी पुरविलेली रसद आग आटोक्यात आणण्याकामी महत्त्वाची ठरली. महत्त्वाचे म्हणजे, या गोदामापासून हाकेच्या अंतरावर ऑईलने भरलेले दहा लाख लिटरचे दोन मोठे टँक होते. ही आग या टँकपर्यंत पोहचली असती, तर कळंबोलीचे जयपूर होण्यास वेळ लागला नसता. इंडियन ऑईलच्या डेपोत आपत्कालीन परिस्थितीसाठी वॉटर टँक उभारण्यात आले आहेत. मात्र, या टाक्यांपर्यंतही आग पोहचू लागली होती. त्यामुळे आग विझविताना कंपनीतील पाण्याच्या टाक्या उपयोगात याव्यात, यासाठी सुरुवातीला शर्थीचे प्रयत्न करावे लागले. आग विझविताना चोहोबाजूंनी अशी आखणीबद्ध पावले उचलली गेली. यात सहभागी झालेल्या अग्निशमन अधिकाऱ्यांनी मात्र याशिवाय फार बोलणे टाळले. इंडियन ऑलच्या या गोदामास लागूनच लांबलचक औद्योगिक पट्टा आहे. कंपनीस खेटून आणखी कारखाने आहेत. त्यामुळे परिस्थिती आणखी भयावह झाली असती. अग्निशमन जवानांनी ही वेळ येऊ दिली नाही. ■

# इंडियन ऑईलच्या गोदामाला आग !



## दोन लाख लिटर वंगण आगीच्या भक्ष्यस्थानी

**पनवेल, १८ जानेवारी /प्रतिनिधी**

ज्वालाग्राही अशा लाखो लिटर वंगणाचा साठा करणाऱ्या तळोजा औद्योगिक वसाहतीतील इंडियन ऑईलच्या गोदामाला सोमवारी मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीमुळे या भागात एकच खळबळ उडाली. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सुमारे १० लाख लिटरपेक्षा अधिक वंगणाचा साठा या ठिकाणी असल्याने आगीची धग ऑईल टँकपर्यंत पोहचू नये, यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना तब्बल १२ तासांहून अधिक काळ अथक प्रयत्न करावे लागले. तरीही तब्बल दोन लाख लिटर वंगण आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अग्निशमन दलाच्या १२ बंबांनी सकाळी साडेसात वाजेपर्यंत केलेल्या अथक प्रयत्नांनंतर ही आग आटोक्यात आणली आणि त्यानंतर दुपारी तीन वाजेपर्यंत आग पुन्हा धगधगू नये, यासाठी प्रयत्न केले जात होते. जयपूर येथील इंडियन ऑईलच्या डेपोला लागलेल्या भीषण आगीची आठवण ताजी करणाऱ्या या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीत टी-२९ या भूखंडावर इंडियन ऑईलचे हे गोदाम उभे आहे. या गोदामात ऑटोमोबाईल इंडस्ट्रीसाठी लागणाऱ्या लुब्रिकंट ऑईलचा मोठा साठा नेहमी असतो. सोमवारी मध्यरात्री टँकमध्ये हे वंगण भरण्याचे काम सुरू होते. यावेळी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास यातील एक ड्रम फुटून मोठा भडका उडाला. त्यानंतर बघता-बघता या गोदामात आगीचे लोण पसरले. घटनेचे गांभीर्य ओळखून सर्व कामगार गोदामाबाहेर आले खरे, मात्र तब्बल चार हजार चौरस मीटरच्या संपूर्ण भागात आग पसरली. रात्री दोन वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन विभागास घटनेची माहिती मिळताच सिडको, नवी मुंबई महापालिका, जेएनपीटी यांसारख्या प्राधिकरणांचे आग विझविणारे बंब घटनास्थळी दाखल झाले. .

एमआयडीसीचे विभागीय अग्निशमन अधिकारी आणि जवानांनी ही आग आटोक्यात आणण्यासाठी तब्बल १२ तासांहून अधिक काळ शर्थीचे प्रयत्न केले. ज्या गोदामास आग लागली होती, तिथून हाकेच्या अंतरावर सुमारे दहा हजार लिटर क्षमतेचे ऑईलचे दोन टँक होते. याशिवाय २०० लिटर क्षमतेचे सुमारे शंभराहून अधिक ड्रम याच भागात होते. त्यामुळे आग आटोक्यात आणताना अत्यंत नियोजनबद्धरीत्या आखणी करण्यात आली. अग्निशमन दलाच्या १२ बंबांच्या सहाय्याने सकाळी साडेसात वाजता ही आग आटोक्यत आणण्यात आली. या आगीत दोन लाख लिटर वंगण जळून खाक झाल्याने कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. ■

SANTOSH SHINDE



# OIL'S UP IN SMOKE

A major fire broke out at Indian Oil Corporation's tube blending plant at Taloja in Navi Mumbai late on Monday night. Security personnel alerted the local fire brigade, and it was doused by 7.30 am on Tuesday. No casualties were reported. A preliminary probe indicates that the blaze was caused by a short circuit.

# Indian Oil fire: 40,000 litres of fuel goes down the drain

**EXPRESS NEWS SERVICE**
JANUARY 18

A MAJOR fire broke out at the Indian Oil Corporation (IOC) oil storage depot in Taloja at Navi Mumbai on Monday night. It took the fire officials over six hours to douse the fire. "The fire began at about 2 am in the night", according to a fire official.

"It took almost six hours for the fire to be douzed and at least 6-7 hours for the cooling operations," said Regional Fire Officer, Devendra Potphode.

While no casualties were reported, thousands of drums carrying lubricant oil were destroyed. According to officials, around 40,000-50,000 litres of lubricant oil got destroyed in the fire.

"Our strategy was to not allow the fire to spread. The intensity of the heat was too much. Somehow, we could control the fire and the spread of fire," said Devendra Potphode.

"The IOC plant is a lubricant oil blending plant, where lubricants are blended and filled in small cans and drums, besides filling specialty lubes," said Potphode.

"As the plant operates on a single shift from 8 am to 5 pm, the plant was shut down when the fire broke out," said Potphode.

According to a fire official, the blaze which was noticed by security personnel, began from containers containing lubricant oil.

While only 12 fire engines were rushed to the spot, the fire brigade used water tankers from the IOC depot itself, according to a fire official.

"Unless we investigate the matter, the cause of the fire cannot be deduced," said Potphode.

Over a year back, in October 2009, at least ten people were killed and more than a hundred injured in a similar fire at the Indian Oil Corporation depot on the outskirts of Jaipur.

REUTERS



What remained of the depot after the fire was brought under control on Tuesday

MUMBAINews The Indian EXPR
Second Floor, Express Towers, Nariman Point | Mumbai-400021 | India | E-MAIL: mumbai.newsline@expressindia.com | Phone: 2202-2627 / 6744-0000 | Fax: 22835726

# HEAT OF THE MOMENT

NARENDRA VASKAR



**Firemen try to control a blaze that broke out at a lubricant-filling depot of Indian Oil Corporation in Navi Mumbai on Tuesday morning.**

**The fire was contained after about six hours and no one was injured. However, around 50,000 litres of lubricant oil was destroyed in the blaze.** **REPORT PAGE 3**

# Firemen contain Taloja IOC blaze in 6 hrs, avert disaster

**Vijay Singh** | TNN

Pics: K K Choudhury & Santosh Shinde



**TAMING AN INFERNO:** According to officials, a short-circuit may have triggered the mishap



**Navi Mumbai:** The fire that broke out at Indian Oil Corporation's lube-oil blending plant at Taloja early on Tuesday was controlled and contained within a small area by firemen in a span of six hours.

Had it taken more time to douse the blaze, a bigger disaster was imminent, said officials, adding that no one was injured in the incident.

"This was by far the biggest fire mishap in the MIDC zone. The exploding lube oil drums compounded our problems," said MIDC divisional fire officer (Konkan region) Devendra Potphode, adding that 15 fire engines from Kalamboli and Ambarnath were pressed into service through the night. According to Potphode, their main concern was to contain the fire within the affected area of 3,000 sq metres of oil blending and packing zone. "Within the IOC plant, there is a huge godown that is used for storing nearly 200 kilolitres of oil. Incidentally, the godown is perilously close to the spot which was up in flames. We successfully prevented the fire from spreading between 2 am and 8 am; after which the cooling operations began," said Potphode.

A N Jha, IOC's general manager of corporate communications and branding, told TOI, "The exact cause of the fire or the extent of damage is not known at this stage. The lubricant blending and packing plant at Taloja is functional only between 8.30 am and 5 pm daily, after which the power supply is shut down. At 1.30 am, the night security personnel noticed sparks at the site. Our in-built fire fighting systems immediately started functioning to control the damage," said Jha.

"Lube oil is basically a 'C' class petroleum product, and so it is not highly inflammable like refined petrol or diesel. The quick and effective response of the fire brigade was commendable" he added.

Meanwhile, fire officials pointed that preliminary study of the site indicated that the blaze could have been triggered by a short-circuit. They also estimated that around 2 lakh litres of lube oil could have been destroyed in the accident. However, Jha countered that they still have to calculate the extent of loss.

DCP Ankush Shinde, who was also present at the spot recalled that they were very concerned at the sight and sounds of oil drums exploding in the fire. "However, the firemen managed to douse it in time," he said.